नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १६६ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. २१ मे २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# दादांच्या अपघातामागे खरातच मास्टरमाईंड?

## रोहित पवारांनंतर अमोल मिटकरींच्या आरोपांनी खळबळ

**मुंबई : (स. गांवकरी)**

अजित पवार यांच्या अपघाताबाबत वारंवार शंका उपस्थित केल्या जात आहेत. आमदार रोहित पवार आणि राष्ट्रवादी (अजित पवार) चे नेते अमोल मिटकरी यावर सातत्याने प्रश्न उपस्थित करत आहेत. राज्यात भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण उघडकीस आल्यानंतर याचा संबंध देखील अपघाताशी जोडला जात आहे. खरात प्रकरणात राजकीय नेत्यांची नावे समोर आल्यानंतर याबाबत शंका उपस्थित करण्यात आल्या. अमोल मिटकरी यांनी तर आता अजित पवारांच्या अपघातामागे अशोक खरातच मास्टरमाईंड असल्याची शंका व्यक्त करण्यास वाव मिळत असल्याचे म्हटले आहे. अशोक खरातने बदललेले मोबाईल आणि केलेले फोन कॉल्स संपूर्ण प्रकरणात दुर्लक्षित राहिल्याचे मिटकरी यांनी म्हटले आहे. विधान परिषदेचे माजी आमदार अमोल मिटकरी यांनी एक्स (पूर्वीचे ट्विटर) वर एक पोस्ट करुन अजित पवारांच्या अपघाताबाबत शंका उपस्थित केली. डिसेंबर महिन्याच्या अखेरीस



खरात कोणाकोणाच्या संपर्कात होता याचा देखील एसआयटी प्रमुखांनी तपास करण्याची गरज मिटकरींनी पोस्टमधून व्यक्त केली आहे.

"अजित पवारांच्या विमान अपघातामागे कॅप्टन अशोक खरात हाच मास्टरमाईंड आहे या शंकेस वाव मिळतोय. खरातने बदललेले मोबाईल व केलेले फोन कॉल्स ही बाब या संपूर्ण प्रकारणात दुर्लक्षित राहिली आहे. २७,२८,२९,३०,३१ डिसेंबर २०२६ ला खरात वेगवेगळ्या मोबाईलवरून कुणाकुणाच्या संपर्कात राहून यथाकाळे कार्यसिद्धी करत होता हे एसआयटी तपास प्रमुखांनी तपासातून सिद्ध करायला हवे. मात्र एकंदरीत याच तपास कार्यावर आता प्रश्नचिन्ह निर्माण होतय", अशी पोस्ट करुन मिटकरींनी शंका व्यक्त केली आहे.

अशोक खरातने पाचवेळा मोबाईल फोन बदलला असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी एसआयटी प्रमुखांना दिली आहे, या आरोपात तथ्य असल्याचेही मिटकरींनी यापूर्वी म्हटले होते. खरात प्रकरणाचा अजित पवार विमान अपघाताशी संबंध असल्याची शंका तेजस्विनी सातपुते यांच्याकडे व्यक्त केली होती पण, त्यांच्याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळाला नसल्याचे मिटकरींनी म्हटले होते. दमानिया यांना तरी त्या गांभीर्याने घेतील अशी अपेक्षा मिटकरींनी व्यक्त केली होती.

अजितदादांच्या अपघात प्रकरणात भोंदू खरातचे कनेक्शन समोर येत असून, 'त्या' सहा दिवसांत खरातने चार फोन बदलले, तर एक फोन केवळ १९ मिनिटांचा कॉल करून बदलला. खरातच्या फोनवर सर्वाधिक कॉल अजितदादांच्या अपघाताच्या दिवशी झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे.

### रोहित पवारांचाही आरोप

आमदार रोहित पवारांनी देखील अजितदादांच्या अपघात प्रकरणात भोंदू खरातचे कनेक्शन समोर येत असल्याचे म्हटले होते. सहा दिवसांत खरातने चार फोन बदलले, तर एक फोन केवळ १९ मिनिटांचा कॉल करून बदलल्याचा दावा रोहित पवारांनी केला. खरातच्या फोनवर सर्वाधिक कॉल अजितदादांच्या अपघाताच्या दिवशी झाल्याचेही पवारांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.


### सीबीआयकडे तपास देण्याची मागणी

अजित पवारांच्या विमान अपघात प्रकरणात सीआयडीकडे माहिती देऊनही कारवाई होत नसल्याने रोहित पवारांनी नाराजी व्यक्त केली. तसेच हा तपास सीबीआयकडे देण्याची गरजही त्यांनी यापूर्वी व्यक्त केली आहे. सीबीआयकडे तपास देण्यास उशीर केल्यास संशयाचं धुकं अधिक गडद होईल, शिवाय गुन्हेगार पुरावे सुद्धा दडपतील, अशी भीती रोहित पवारांनी व्यक्त केली होती.

## डोळ्याच्या शस्त्रक्रियेसाठी उपचार करताच रक्ताची उलटी झाली

**पुणे : (स. गांवकरी)**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णाल पुन्हा एकदा चर्चेत आलं आहे. डोळ्याच्या शस्त्रक्रियेदरम्यान सहा वर्षीय प्रियदर्शनी बागडे हिचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. संबंधित डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे मुलीचा जीव गेल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या प्रकरणी अलंकार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. प्रियदर्शनीला डोळ्यात तिरळेपणाचा त्रास असल्याने उपचारासाठी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. 10 मे रोजी प्राथमिक तपासणीनंतर डॉक्टरांनी काचबिंदूची शक्यता व्यक्त करत डोळ्याच्या मागील पडद्याची सखोल तपासणी करण्याचा सल्ला दिला होता. त्यानुसार 14 मे रोजी भूलतज्ज्ञांकडून तपासणी आणि रक्तचाचण्या करण्यात आल्या. सर्व अहवाल सामान्य असल्याचं सांगून 18 मे रोजी शस्त्रक्रियेसाठी बोलावण्यात आलं. सोमवारी सकाळी प्रियदर्शनीला ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यात आले. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, त्यावेळी ती



- ६ वर्षांच्या चिमुकलीचा मृत्यू
- दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर निष्काळजीपणाचा आरोप

पूर्णपणे व्यवस्थित होती. मात्र डोळ्यात औषधी ड्रॉप टाकल्यानंतर अचानक तिला रक्ताची उलटी सुरू झाली. काही वेळाने डॉक्टरांनी मुलीच्या तोंडातून रक्त येत असल्याचं आणि हृदयाचे ठोके बंद पडल्याचं सांगितलं. कुटुंबीयांचा आरोप आहे की, पालकांना कोणतीही पूर्वकल्पना न देता मुलीला तातडीनं अतिदक्षता विभागात हलवण्यात आलं. त्यानंतर 'सीपीआर देत आहोत' असे सांगण्यात आलं, मात्र काही वेळातच मुलीचा मृत्यू झाल्याची माहिती देण्यात आली. घटनेनंतर प्रकरण दडपण्यासाठी आर्थिक आमिष दाखवण्याचाही प्रयत्न झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

## थोडक्यात...

### द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

**मुंबई (स. गांवकरी) :** भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेमध्ये सोळा फळपिकांचा समावेश आहे. पण, द्राक्ष पिकाचा समावेश नव्हता. बुधवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीत द्राक्ष पिकाचा योजनेत समावेश करा. त्या बाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करा, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आयुक्तांना दिले. हा निर्णय द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा ठरणार आहे. द्राक्ष निर्यात आणि संशोधनाला आर्थिक मदत देण्याची घोषणाही भरणे यांनी केली. मंत्रालयात आयोजित बैठकीत द्राक्ष पिकाचा भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेत समावेश करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

## राज्यातील महिलांसाठी आता जिल्हास्तरावर 'पीसीओडी क्लिनिक'

**परभणी : (स. गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यभर "पॉलीसिस्टिक ओव्हेरियन डिसीज (पीसीओडी) क्लिनिक" सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या 'पीसीओडी' समस्येवर वेळेत निदान, उपचार आणि समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी ही नवीन विशेष उपक्रम सुरू करण्यात आला आहे. आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी ही माहिती दिली. राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांनी यासंदर्भात सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना आदेश जारी केले आहेत. या निर्णयामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांना तज्ज्ञ उपचार आणि मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.



- महिलांना स्त्रीरोग तज्ज्ञांकडून तपासणी ते एकात्मिक पद्धतीने उपचार

'पीसीओडी' ही महिलांमध्ये आढळणारी हार्मोनल समस्या असून त्याचा परिणाम मासिक पाळीतील अनियमितता, वजन वाढ, वंध्यत्व, मानसिक ताण, त्वचेच्या समस्या तसेच इतर आरोग्यविषयक गुंतागुंतांवर होत असतो. विशेषतः किशोरवयीन व प्रजननक्षम वयोगटातील महिलांमध्ये या समस्येचे प्रमाण वाढत असल्याने राज्य शासनाने यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

## गोदावरी नदीपात्रातील वाळू उपशाविरोधित महिला आक्रमक

### ग्रामसभांतून जागता पहारा ठेवण्याचा निर्धार

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

श्रीरामपूर तालुक्यातील रामपूर कोकरे परिसरातील गोदावरी नदीपात्रातील वाळूपट्ट्याच्या लिलावाविरोधात ग्रामस्थांनी तीव्र आक्रमक भूमिका घेतली. महिलांवर झालेल्या कथित दगडफेकीच्या घटनेनंतर रामपूर व नाऊर येथे आज, बुधवारी झालेल्या विशेष ग्रामसभांमध्ये संतप्त भावना व्यक्त करण्यात आल्या. महिलांनी वाळू उपशासाठी रस्ता होऊ देणार नाही, नदीपात्रातील वाळूचा एक खडादेखील उचलू देणार नाही, असा निर्धार व्यक्त केला.

रामपूर येथील विशेष ग्रामसभेत महिलांनी आक्रमक भूमिका घेत वाळू उपसा व वाहतुकीला ठाम विरोध दर्शविला. परिसरातील शांतता, शेती व पाणीपुरवठा धोक्यात घालणाऱ्या वाळू उपशाविरोधात आता अहोरात्र जागता पहारा ठेवण्याचा निर्धार ग्रामसभेतून व्यक्त करण्यात आला. नंतर महिलांनी ट्रॅक्टरमधून नाऊर गावाकडे मोर्चा काढत तेथेही विशेष ग्रामसभा घेतली. नाऊर ग्रामस्थांनीदेखील एकमुखाने वाळू उपशाला विरोध दर्शवत शासनाने संबंधित वाळूपट्ट्याचा लिलाव तात्काळ रद्द करावा, अशी मागणी केली. दोन्ही गावांतील ग्रामस्थांनी 'गोदावरी नदी ही परिसराचा आत्मा आहे', असे सांगत नदीपात्रातील वाळू संवर्धनासाठी एकजुटीने लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला. ग्रामस्थांनी सांगितले की, गेल्या अनेक दशकांपासून रामपूर व नाऊर परिसरातील नागरिकांनी गोदावरी नदीतील वाळूचे संरक्षण केले आहे. शंभर वर्षांच्या इतिहासात आम्ही वाळूचा एककणदेखील उचलू दिलेला नाही. यापुढेही वाळूचे रक्षण करण्यासाठी आम्ही सक्षम आहोत, असा निर्धार महिलांनी ग्रामसभेत व्यक्त केला. वाळू उपसासाठी लिलाव घेतलेल्या



ठेकेदाराने ग्रामस्थांच्या विरोधावरून रस्ता तयार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी महिलांनी विरोध केला. ठेकेदार समर्थकांनी महिलांवर दगडफेक केल्याचा आरोप आहे. या घटनेचा निषेध करत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली. दरम्यान, गोदावरी परिसरातील सर्व गावांनी एकत्र येऊन नदी संवर्धनासाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. त्यामुळे प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे लक्ष लागले आहे. महिलांवर दगडफेक होऊनही संबंधित वाळू वाहतूकदारांवर अद्याप ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महसूल प्रशासनाने दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी होत आहे. लवकर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. रामपूर, नाऊरसह सराला- गोवर्धन, वांजरगाव या गोदावरी नदी परिसराचा वाळू उपसाला विरोध असून वाळू उपशामुळे शेतीचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होतो, मुले व्यसनाधिन बनतात, रस्त्याची दुरवस्था होते, विद्यार्थ्यांचा येण्या-जाण्याचा प्रश्न निर्माण होतो, भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या सराला बेटाला पूराचा धोका निर्माण होऊ शकतो, याकडे ग्रामस्थ लक्ष वेधतात.

## शिर्डीत एका हाराची किंमत तब्बल १९०० रुपये! लुटीचा प्रकार उघड

**राहाता : (स. गांवकरी)**

शिर्डीत साईभक्तांच्या श्रद्धा आणि भावनांचा गैरफायदा घेत उघडपणे आर्थिक लूट करणाऱ्या टोळीचा पुन्हा एकदा पर्दाफाश झाला असून, मंदिर परिसरातील दोन नंबर गेटसमोरील एका फुलभांडार दुकानातून एका हारासाठी तब्बल १ हजार ९०० रुपये दर आकारल्याचा प्रकार समोर आला आहे. शिर्डी नगर परिषदेने मंदिर परिसरात हार, फुले, प्रसाद विक्रीच्या दराचे अधिकृत फलक लावलेले आहेत. तरीही भाविकांची लूट होत आहे. संबंधित भाविकाच्या तक्रारीनंतर देवस्थानाची सुरक्षा यंत्रणा संबंधित दुकानावर जाताच, दुकानदाराला घेतलेले सर्व पैसे परत करावे लागले. त्यामुळे भाविकाला दिलासा मिळाला. मुंबईहून आलेल्या साईभक्तांना शिर्डीत प्रवेश करताच काही एजंटांनी गाठत दोन मिनिटांत दर्शन करून देतो, व्हीआयपी मार्गाने आत सोडतो, गाडी पार्किंगची व्यवस्था करतो, अशी आमिषे दाखवत थेट मंदिर परिसरातील दोन नंबर गेटसमोरील एका फुलभांडार दुकानात नेले. तेथे हार, फुले आणि प्रसाद घेण्यासाठी दबाव टाकण्यात आला. श्रद्धेपोटी आणि अनोळखी ठिकाण असल्याने भाविकांनी साहित्य घेतले. मात्र, नंतर एका हारासाठी तब्बल १ हजार ९०० रुपये घेतल्याचे समोर आले. शिर्डी नगर परिषदेकडून मंदिर परिसरात हार-फुलांचे



अधिकृत दरफलक लावण्यात आलेले आहेत. तरीसुद्धा काही दुकानदारांकडून सर्रास मनमानी दर आकारले जात असल्याचे पुन्हा सिद्ध झाले आहे. दरफलक फक्त दाखविण्यासाठी आहेत का, असा संतप्त सवाल भाविक विचारत आहेत. या प्रकारानंतर संबंधित साईभक्तांनी संस्थानचे संरक्षण अधिकारी रोहिदास माळी यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी तत्काळ सुरक्षा यंत्रणा सक्रिय केली आणि संबंधित दुकानावर अधिकाऱ्यांना पाठवले. अखेर दुकानदाराला घेतलेले सर्व पैसे परत करावे लागल्याने भाविकांना दिलासा मिळाला.

*शिर्डीत साईभक्तांची श्रद्धा आणि भावनांचा गैरफायदा घेत उघडपणे आर्थिक लूट करणाऱ्या टोळीचा उपद्रव वाढत आहे. भाविकांची फसवणूक करणाऱ्यांना फक्त समज देऊन चालणार नाही. संबंधित दुकानाचा परवाना रद्द करा, दुकानाला टाळे ठोकून फौजदारी गुन्हा दाखल करा. त्याचबरोबर मंदिर परिसरातील दलालांचे जाळे उद्ध्वस्त करा.-प्रमोद गोंदकर,स्थानिक कार्यकर्ते*






## थोडक्यात पण महत्वाचे



### भक्ती शक्ती मंदिरात एक दिवसीय गुरुचरित्र पारायण सोहळा

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील डुंबरवाडीतील श्री स्वामी समर्थ भक्ती शक्ती मंदिर, ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे सेवा संस्था यांच्या वतीने गुरुवार दि. २१ मे २०२६ रोजी अधिक मास या पवित्र महिन्याच्या शुभपरवावर व गुरुपुष्यामृत योगावर एकदिवसीय गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात सकाळी ७:३० ते ८ वा. भुपाळी आरती, सकाळी ८ ते १०:१५ वा. गुरुचरित्र सामुदायिक पारायण, सकाळी १०:३० ते ११:०० वा. स्वामींची महाआरती, सकाळी ११ ते १२ वा. सामुदायिक पारायण, दुपारी १२ ते १ वा. महाप्रसाद, दुपारी १ ते ६ वा. सामुदायिक पारायण, सायंकाळी ६:३० ते ७ वा. महाआरती, सायंकाळी ७ वा. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. पारायण नेतृत्व सौ. प्रियंका सचिन हाडवळे, सौ. अपेक्षा दत्तात्रय गोरे हे करणार आहेत. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ह.भ.प. विठ्ठल महाराज शितोळे (सर)हे करणार असून कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. नानजीभाई ठक्कर (ज्येष्ठ समाजसेवक, दानशूर व्यक्तिमत्व समाजरत्न व अध्यक्ष एनकेटी चॅरीटेबल ट्रस्ट) व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस श्री. विश्वासराव आरोटे यांची राहणार असल्याचे ह. भ. प. चंद्रकांत महाराज डुंबरे सेवा संस्था, संस्थापक / अध्यक्ष माळशेज नागरी सहकारी पतसंस्था यांनी सांगितले. तरी या सोहळ्याचा पंचक्रोशीतील भाविकांनी घ्यावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



### आमदार शेखर निकम यांची अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांशी चर्चा

मुंबई (स. गांवकरी) : राज्यात वाढत्या ऑनलाइन औषध विक्रीमुळे सार्वजनिक आरोग्य, रुग्ण सुरक्षा तसेच अधिकृत औषध विक्रेत्यांसमोर निर्माण झालेल्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर आमदार शेखर निकम यांनी राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांची मंत्रालयात भेट घेत संबंधित विषयाकडे गांभीर्याने लक्ष वेधले. यापूर्वी चिपळूण तालुका औषध विक्रेते संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार शेखर निकम यांची भेट घेऊन ऑनलाइन औषध विक्रीमुळे उद्भवत असलेल्या विविध अडचणींबाबत सविस्तर निवेदन दिले होते. या निवेदनाची गंभीर दखल घेत आमदार निकम यांनी हा विषय शासन दरबारी प्रभावीपणे मांडत मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याशी सविस्तर चर्चा केली. यावेळी ऑनलाइन माध्यमातून वैद्यकीय चिठ्ठीची योग्य पडताळणी न करता होणारे औषध वितरण, काही कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या अवाजवी सवलती तसेच त्यामुळे पारंपरिक आणि अधिकृत औषध विक्रेत्यांवर होत असलेला आर्थिक परिणाम या विषयांकडे आमदार निकम यांनी मंत्र्यांचे लक्ष वेधले. औषध विक्री हा अत्यंत संवेदनशील विषय असून तो थेट जनतेच्या आरोग्याशी संबंधित असल्याने यासंदर्भात कठोर नियमावली आणि प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच अवैध ऑनलाइन औषध विक्रीवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने तातडीने प्रभावी पावले उचलावीत, रुग्ण सुरक्षा सुनिश्चित करावी तसेच अधिकृत औषध विक्रेत्यांच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण करावे, अशी मागणीही आमदार शेखर निकम यांनी यावेळी केली. यावर मंत्री नरहरी झिरवाळ यांनी जनतेचे आरोग्य, रुग्णांची सुरक्षितता तसेच अधिकृत औषध विक्रेत्यांचे हित जपण्यासाठी शासन स्तरावर सकारात्मक पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

### परभणी-हिंगोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी आचारसंहिता लागू

हिंगोली (स. गांवकरी) : महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीची घोषणा भारत निवडणूक आयोगाने अधिकृतरित्या करताच राज्यातील राजकीय वातावरण तापू लागले असून, परभणी-हिंगोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातही निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. आयोगाच्या आदेशानुसार दि. १८ मे २०२६ पासून संबंधित जिल्ह्यांमध्ये आचारसंहिता लागू करण्यात आली असून, प्रशासनाने निवडणूक तयारीला वेग दिला आहे. भारत निवडणूक आयोगाच्या प्रसिद्धीपत्रक क्र. ECI/PN/087/2026 दि. १८.०५.२०२६ अन्वये महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीची घोषणा करण्यात आली. या घोषणेनंतर परभणी व हिंगोली जिल्ह्यात निवडणूक आचारसंहिता तत्काळ प्रभावाने लागू झाली असून, शासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध विभागांच्या कामकाजावर आता निवडणूक आयोगाचे बारीक लक्ष राहणार असून, शासकीय जाहिराती, नवीन विकासकामांच्या घोषणा, निधी वितरण, उद्घाटने यावर निर्बंध लागू होणार आहेत. तसेच निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली आहे.

### तालुक्यात दोन वेगवेगळ्या घटनांत दोघांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू

पारनेर (स. गांवकरी) : तालुक्यात सोमवार, दिनांक १८ मे रोजी दोन वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या अत्यंत दुर्दैवी घटनांमध्ये पाण्यात बुडून दोघांना आपला जीव गमवावा लागला आहे. या दोन्ही घटनांमुळे पारनेर तालुक्यावर मोठी शोककळा पसरली असून, उन्हाळ्याच्या दिवसांत पोहण्यासाठी जाणाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पहिली घटना पारनेर तालुक्याच्या पठार भागावरील बहिरोबावाडी येथे घडली. सोमवार दुपारी बारा वाजेच्या सुमारास तिखोल रस्त्यालगत असलेल्या एका शेततळ्यामध्ये परिसरातील साधारण १० ते १२ लहान मुले आणि काही युवक पोहण्यासाठी गेले होते. यामध्ये साई सिताराम देठे (वय ११ वर्षे) हा मुलगा पाठीला प्लास्टिकचा ड्रम बांधून पोहणे शिकण्याचा प्रयत्न करत होता.

# ‘आर्य नागार्जुन संग्रहालया’चा रौप्य महोत्सव उत्साहात संपन्न

## सध्या जगाला युद्धाची नाही, बुद्धाच्या विचारांची गरज – उपमहापौर परशुराम वाडेकर

पुणे : (स. गांवकरी)




बौद्ध इतिहास, संस्कृती आणि सामाजिक वारसा जपणाऱ्या ‘आर्य नागार्जुन संग्रहालया’च्या रौप्य महोत्सवी वर्षाचा सोहळा रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. ‘आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिना’चे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या विशेष कार्यक्रमात संग्रहालयाच्या २५ वर्षांच्या उल्लेखनीय प्रवासाचा आढावा घेण्यात आला. तसेच संग्रहालयाच्या जतन, संवर्धन आणि विस्तारासाठी योगदान देणाऱ्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

बौद्ध इतिहास आणि संस्कृती संशोधन संस्थेच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या या संग्रहालयाची स्थापना ९ एप्रिल २००० रोजी झाली होती. गेल्या २५ वर्षांत संग्रहालयाने सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. या वेळी संग्रहालयाचे संस्थापक तथा ज्येष्ठ संग्राहक कै. दिलीप लक्ष्मण वानखेडे यांच्या ऐतिहासिक आणि दुर्मिळ संग्रह जतन करण्याच्या कार्यावर विशेष प्रकाश टाकण्यात आला.

कार्यक्रमात पाली भाषेचे वरिष्ठ अभ्यासक, लिपीतज्ज्ञ आणि लेणी संवर्धक मा. अतुल भोसेकर यांनी ‘बौद्ध संग्रहालयाची वैश्विकता’ या विषयावर विशेष व्याख्यान दिले. त्यांनी इतिहासकालीन दाखल्यांसह महान सम्राट अशोकांनी भारतातील पहिले बौद्ध संग्रहालय कशा प्रकारे उभारले, याविषयी माहिती दिली. संग्रहालयांचे महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले, “इतिहास आणि संस्कृती जिवंत ठेवण्यात संग्रहालयांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येकाने वेळोवेळी संग्रहालयांना भेट देऊन त्यांचे बारकाईने अवलोकन केले पाहिजे. लोकसहभागातूनच संग्रहालये जिवंत राहतात.”

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आणि पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर मा. परशुराम वाडेकर यांनी संग्रहालयाच्या २५ वर्षांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. संग्रहालयाच्या विस्तारासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन देताना त्यांनी जागतिक परिस्थितीवर भाष्य केले. “आज जगभर युद्धाचे सावट आहे. अशा परिस्थितीत महात्मा गौतम बुद्ध यांचे शांतता, करुणा आणि बंधुभावाचे विचारच मानवजातीला दिशा देऊ शकतात. सध्याच्या घडीला जगाला युद्धाची नव्हे, तर बुद्धाच्या विचारांची गरज आहे,” असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव मा. बाळासाहेब सावंत यांनी कै. दिलीप वानखेडे यांच्या ऐतिहासिक संग्रहकार्याचा गौरव करत संग्रहालयाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शन वंदनीय भंते नाग दीपंकर महास्थवीर यांनी केले. त्यांच्या हस्ते बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संग्रहालयाच्या अध्यक्षा मा. कल्पना दिलीप वानखेडे यांनी प्रस्तावना व आभार प्रदर्शन केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. दीपक मस्के यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन कुलदीप वानखेडे आणि हर्षवर्धन वानखेडे यांनी केले.

यावेळी स्त्रीभूषण रमाई आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष विठ्ठलराव गायकवाड, पुणे मनपाचे नगरसेवक निलेश आल्हाट, वसुंधरा भोसेकर यांच्यासह सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ‘अपोलो नेस्ट– मातृत्वाच्या प्रवासाची साथ’ उपक्रमाचा शुभारंभ

पुणे : (स. गांवकरी)

मातृदिनानिमित्त अपोलो हॉस्पिटल्स पुणे येथे मातृत्वाचा सन्मान, कृतज्ञता आणि प्रेरणेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. समाजातील मातांच्या अमूल्य योगदानाला सलाम करण्यासाठी आयोजित विशेष कार्यक्रमात पुण्यातील अनेक मातांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. आनंद, उत्साह आणि आरोग्यविषयक जनजागृतीने भरलेला हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ आणि मीरा परिचर्या गृहाच्या संचालिका डॉ. सुनीता पोटे, भारतातील पहिल्या महिला रिक्षाचालक सौ. शीला दावरे तसेच अभिनेते सिद्धार्थ चांदेकर यांच्या आई सौ. सीमा चांदेकर यांचा समावेश होता. मातृत्व, कुटुंब आणि सामाजिक जबाबदाऱ्या यांचा उत्तम समतोल साधत प्रेरणादायी कार्य करणाऱ्या या मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात आला. विविध पिढ्यांतील महिलांसाठी त्या प्रेरणास्थान असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.



कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मनीषा करमरकर यांनी मातांची जिद्द, ताकद आणि निस्वार्थ प्रेम याविषयी मनोगत व्यक्त केले. मातृत्वाच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांना योग्य आरोग्यसेवा आणि भावनिक आधार मिळणे किती महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

## अहिल्यानगर विधान परिषद स्थानिक संस्था निवडणूक

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक २०२६ जाहीर केली असून अहिल्यानगर जिल्ह्यात निवडणुकीची आचारसंहिता सुरु झाली आहे. निवडणूक शांततापूर्ण, पारदर्शक आणि निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू केली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी दादासाहेब गिते, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) दत्तात्रय कवितके, तहसीलदार श्वेता संचेती, नायब तहसीलदार विशाल सदनापूर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, या निवडणुकीसाठी दि. २५ मे २०२६ रोजी अधिसूचना जारी करण्यात येणार असून दि. १ जूनपर्यंत उमेदवारांना नामनिर्देशन अर्ज दाखल करता येणार आहेत. दि. २ जून रोजी अर्जांची छाननी होणार असून दि. ४ जून ही अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत राहणार आहे. दि. १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होईल. तर २२ जून रोजी मतमोजणी होऊन २५ जून रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

नामनिर्देशनपत्रे जिल्हाधिकारी यांचे दालन, दुसरा मजला जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत स्वीकारण्यात येणार आहेत. निवडणूक लढविण्यासाठी उमेदवाराचे महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही विधानसभा मतदारसंघात नाव असणे बंधनकारक असून त्याची साक्षांकित प्रत नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील महानगरपालिका, कॅन्टोन्मेंट, नगरपरिषदा व नगरपंचायतींचे सदस्य मतदार म्हणून सहभागी होणार आहेत. अहिल्यानगर महानगरपालिका, संगमनेर, कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, राहुरी, देवळाली प्रवरा, पाथर्डी, श्रीगोंदा, शिर्डी, शेवगाव, कर्जत, अकोले, जामखेड व पारनेर येथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांचा या निवडणुकीत मतदार म्हणून समावेश आहे. एकूण ४६१ मतदार या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. निवडणुकीसाठी मतपत्रिकेचा वापर करण्यात येणार असून मतदारांनी पसंती क्रमानुसार मतदान करावयाचे आहे. मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक जम्बो बॅलेट बॉक्सची व्यवस्था करण्यात आली असून मतदान केंद्रांची व्यवस्था संबंधित तहसील कार्यालयांमध्ये करण्यात आली आहे. प्रत्येक तालुक्यात तहसीलदार यांच्या कक्षात मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. तर या निवडणुकीची मतमोजणी जिल्हास्तरावर करण्यात येणार आहे. निवडणुकीसाठी खुल्या प्रवर्गासाठी १० हजार रुपये तर अनुसूचित जाती, जमातीसाठी ५ हजार रुपये इतकी अनामत रक्कम असणार आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले असून महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपर्टी अ‍ॅक्ट १९९५ तसेच भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सार्वजनिक अथवा खासगी मालमत्तेवर अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, भित्तीपत्रके, झेंडे किंवा घोषणा लावण्यास बंदी घालण्यात आली आहे.

## परभणी जिल्हा कारागृहात अभिनेता संकर्षण कऱ्हाडे यांच्या कवितांची मैफल

### बंदी बांधवांना मुख्य प्रवाहात येण्याची दिली प्रेरणा

परभणी : (स. गांवकरी)



जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने परभणी जिल्हा कारागृहात एका अनोख्या आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परभणीचे भूमिपुत्र, लोकप्रिय मराठी अभिनेते, कवी आणि लेखक संकर्षण कऱ्हाडे यांनी आज मंगळवारी कारागृहातील बंदी बांधवांशी संवाद साधत आपल्या बहारदार कविता सादर केल्या. त्यांच्या या कवितांनी बंदी बांधवांच्या मनाला स्पर्श केला असून, गुन्हेगारीचा रस्ता सोडून पुन्हा समाजमनाच्या मुख्य प्रवाहात येण्याची मोलाची प्रेरणा दिली. कवितांमधून दिला परिवर्तनाचा संदेश अभिनेते संकर्षण कऱ्हाडे यांनी आपल्या अमोघ वाणीने आणि प्रभावी कवितांमधून उपस्थितांना खिळवून ठेवले. केवळ मनोरंजन न करता त्यांनी कवितांच्या माध्यमातून एक गडद सामाजिक संदेश दिला. जीवनातील संघर्ष, माणसाचे परिवर्तन, लोप पावत चाललेली माणुसकी आणि भूतकाळ विसरून नव्या आयुष्याची सुरुवात कशी करावी, याचे सुंदर चित्रण त्यांनी आपल्या साहित्यातून केले.

"चुकलेला प्रत्येक माणूस हा गुन्हेगार नसतो, त्याला सुधारण्याची एक संधी मिळायला हवी," हाच सूर त्यांच्या संपूर्ण सादरीकरणातून उमटत होता.नेहमी चार भिंतींच्या आड तणावाखाली राहणाऱ्या बंदी बांधवांसाठी हा कार्यक्रम एक नवा आशेचा किरण ठरला. संकर्षण कऱ्हाडे यांच्या कविता ऐकताना अनेक बंदी भावूक झाले होते. या मैफलीला बंदी बांधवांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त आणि भरभरून प्रतिसाद दिला. कारागृहातील वातावरण काही काळ अत्यंत सकारात्मक आणि चैतन्यमय झाले होते. गुन्हेगारी प्रवृत्तीपासून दूर नेऊन कैद्यांचे पुनर्वसन करण्यासाठी आणि त्यांच्यात मानसिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश आर एम सदरानी यांच्या मार्गदर्शनात विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश भूषण काळे, कारागृह अधीक्षक राजेंद्र मरळे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हा उपक्रम अत्यंत स्तुत्य मानला जात आहे.

## ‘अद्भुत औषधी वनस्पती पुदिना’च्या फायद्यांचा प्रचार

पुणे : (स. गांवकरी)




आयुर्वेदिक वनस्पतींचे फायदे जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या आपल्या ध्येयाला पुढे नेत भारतातील सर्वात मोठी विज्ञानाधारित आयुर्वेद कंपनी डाबर इंडिया लिमिटेड ने पुदिनाला एक ‘अद्भुत औषधी वनस्पती’ म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. पुदिना अँटिऑक्सिडंट्स आणि फायटोन्यूट्रिएंट्सने समृद्ध असून, विशेषतः कडक उन्हाळ्यात मानवी पोटासाठी अत्यंत लाभदायक ठरतो. उष्णतेच्या लाटा आणि वाढत्या तापमानामुळे उन्हाळ्यात आरोग्याच्या समस्या सातत्याने वाढताना दिसत आहेत. या वाढत्या हंगामी आरोग्य समस्यांवर उपाय म्हणून डाबरने दिवसभर उन्हात राहणाऱ्या आणि उन्हाळ्यातील सामान्य आजारांना बळी पडणाऱ्या लोकांसाठी पुदिनाच्या वापराचा प्रचार सुरू केला आहे. “आधुनिक काळातील अनेक आजारांवरील उत्तम उपाय आयुर्वेदाच्या ग्रंथांमध्ये दडलेले आहेत. पुदिनाचा इतिहास सुमारे ३,००० वर्षांपूर्वीचा असून त्याला ‘अद्भुत औषधी वनस्पती’ म्हणून ओळखले जाते, जी मानवी पचनसंस्थेसाठी अत्यंत उपयुक्त आहे. पुदिनामधील मेंथॉल पचनासाठी आवश्यक एन्झाइम्स सक्रिय करते, पोटातील स्नायूंना आराम देते आणि अपचन व पोटदुखीचा त्रास कमी करण्यास मदत करते. तसेच ॲसिडिटी आणि गॅसच्या समस्यांवरही ते प्रभावी मानले जाते,” असे डॉ. निकिता जगताप यांनी सांगितले.

# हँड सर्जरी अँड ट्रॉमा रिकन्स्ट्रक्शन’ विभागाचा शुभारंभ

### अत्याधुनिक मायक्रोसर्जरी सुविधा आता नाशिकमध्ये उपलब्ध

नाशिक : (स. गांवकरी)

अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे ‘डिपार्टमेंट ऑफ हँड सर्जरी अँड ट्रॉमा रिकन्स्ट्रक्शन’ विभागाच्या शुभारंभानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या विभागाच्या माध्यमातून हाताच्या जटिल दुखापती, नसांचे विकार, टेंडन इन्ज्युरी, ट्रॉमा, मायक्रोसर्जरी तसेच पुनर्बांधणी शस्त्रक्रिया (Reconstructive Surgeries) यांसाठी अत्याधुनिक आणि तज्ज्ञ उपचार सुविधा नाशिकमध्ये उपलब्ध झाल्या आहेत.

या विभागाचे नेतृत्व प्रसिद्ध प्लास्टिक, हँड आणि रिकन्स्ट्रक्टिव्ह मायक्रो सर्जन डॉ. प्रणित मानकरे करणार आहेत. विशेष म्हणजे, डॉ. प्रणित मानकरे यांनी अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आतापर्यंत १५० हून अधिक प्लास्टिक आणि रिकन्स्ट्रक्टिव्ह शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्या असून, त्यांच्या कौशल्यपूर्ण उपचारांमुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळाले आहे. या विभागामध्ये औद्योगिक अपघातांमधील हाताच्या दुखापती, नस आणि रक्तवाहिन्यांच्या इजा, बोटे तुटणे, जन्मजात विकृती, जळीत जखमा, टेंडन आणि नर्व्ह रिपेअर तसेच ट्रॉमा रिकन्स्ट्रक्शनसारख्या जटिल शस्त्रक्रिया आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्यात येणार आहेत. विशेषतः मायक्रोसर्जरी तंत्रामुळे अतिशय सूक्ष्म रक्तवाहिन्या आणि नसांचे पुनर्जोडणी (Reconstruction) अधिक अचूकतेने करता येणार आहे. तसेच, गंभीर भाजलेल्या रुग्णांवर (Burn Patients) उपचार करण्यामध्येही या विभागाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ४०% किंवा त्यापेक्षा अधिक भाजलेल्या रुग्णांनाही आधुनिक उपचारपद्धती, प्लास्टिक सर्जरी आणि रिकन्स्ट्रक्टिव्ह तंत्रज्ञानाच्या सहाय्याने यशस्वीपणे बरे करण्यात आले आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली. यावेळी बोलताना डॉ. प्रणित मानकरे म्हणाले, “हात हा आपल्या दैनंदिन आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. हाताच्या दुखापतीमुळे रुग्णांचे वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवन मोठ्या प्रमाणात प्रभावित होते. वेळेवर आणि योग्य उपचार मिळाल्यास अनेक गंभीर दुखापतींमध्ये हाताची कार्यक्षमता पुन्हा पूर्ववत करता येते. मायक्रोसर्जरी तंत्रज्ञानामुळे आम्हाला अतिशय सूक्ष्म नस, रक्तवाहिन्या आणि ऊतींची पुनर्बांधणी अचूकपणे करता येते. त्यामुळे रुग्णांना अधिक चांगले परिणाम आणि जलद पुनर्वसन मिळते.” ते पुढे म्हणाले, “औद्योगिक क्षेत्र वाढत असताना हाताच्या दुखापतींचे प्रमाणही वाढताना दिसत आहे. अशा वेळी नाशिकमध्येच जागतिक दर्जाच्या हँड आणि रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जरी सुविधा उपलब्ध होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. आमचे उद्दिष्ट केवळ शस्त्रक्रिया करणे नसून, रुग्णांना पुन्हा आत्मविश्वासाने दैनंदिन जीवन जगण्यास सक्षम करणे हे आहे. गंभीर भाजलेल्या रुग्णांनाही योग्य उपचार आणि पुनर्बांधणीद्वारे नवजीवन देता येते, हा आमचा अनुभव आहे.”




यावेळी बोलताना अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे केंद्र प्रमुख श्री. अनुप त्रिपाठी यांनी सांगितले की, “अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सुपर स्पेशालिटी सेवा सातत्याने उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न असतो. ‘हँड सर्जरी अँड ट्रॉमा रिकन्स्ट्रक्शन’ विभागाच्या माध्यमातून आता नाशिक आणि उत्तर महाराष्ट्रातील रुग्णांना मोठ्या शहरात न जाता तज्ज्ञ मायक्रोसर्जरी आणि रिकन्स्ट्रक्टिव्ह उपचार स्थानिक पातळीवर मिळणार आहेत.

## कृतिशील, प्रतिभावंत नेतृत्व

# मा. श्री. मधूभाऊ नवले

(स. गांवकरी)



अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुका हा चळवळीचा व प्रतिभावंतांचा तालुका म्हणून ओळखला जातो. राजकीय पक्षाच्या माध्यमातून किसान सभेचे राज्य पातळीवरील कार्याचा ठसा उमटविलेले अकोल्याचे भूमिपुत्र मधुकरराव नवले अर्थात सर्वांचे श्रद्धेय 'भाऊ'. सहकारमहर्षी कै. भाऊसाहेब थोरात यांना विद्यापीठ मानणारे व त्यांच्यासह कॉम्रेड पी. बी. कडू, कै. अण्णासाहेब शिंदे यांच्या सहवासाचे भाग्य लाभलेले मधूभाऊ यांची ओळख म्हणजे राजकीय, सहकार, शिक्षण, शेती आदी क्षेत्रात कृतीशील असलेले प्रतिभावंत वक्ते व सृजनशील व्यक्ती अशीच आहे. शैक्षणिक मागासलेपणामुळे विद्यार्थी स्पर्धेत टिकत नाही, इंग्रजी शिक्षण नसल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना संधी मिळत नाही हि बाब मनाला वेदना देणारी होती. म्हणून भाऊंनी के. जी. पासून पी. जी. पर्यंत शिक्षण देणाऱ्या संस्था सुरु केल्या. यात संस्थेच्या विश्वस्त मंडळाने त्यांना खंबीर साथ दिली.

कै. कॉम्रेड बुवासाहेब नवले यांचा आदर्श व कर्तृत्वाचा वारसा पुढे ठेवत बुवासाहेब नवले सहकारी पतसंस्था आणि बुवासाहेब नवले मल्टीस्टेट को- ऑप क्रेडिट सोसायटी स्थापन करून उत्तम व्यवस्थापनातून ग्राहकांचा प्रथम विश्वास ठरविणारी व संस्था कशी असावी, याचे उदाहरण त्यांनी समोर ठेवले. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष असताना त्यांनी आपल्या कामाची छाप कायम पाडली. त्यामुळेच त्यांना ना. बाळासाहेब थोरात यांनी शेतकरी हिताचे निर्णय घेण्यासाठी त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा व्हावा म्हणून अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालकपदी नियुक्ती केली. भाऊ बद्दल आणखी किती लिहावे..! लेखणीला देखील अप्रूप वाटावे अशी व्यक्ती.

प्रत्येकाच्या मनाचा विचार करणारे भाऊ म्हणजे प्रत्येकाच्या मनावर राज्य करणारे राजा आहेत व हे अकोल्याचे भूमिपुत्र समाजासाठी आयडॉलच आहेत.

असे आदरणीयव श्रद्धेय व्यक्तिमत्त्व असलेल्या भाऊंना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा... त्यांना उदंड आणि आरोग्यमयी आयुष्य लाभो, ही सदिच्छा.

- डॉ. विश्वासराव आरोटे

# अकोळनेर-निंबळक पाचव्या टप्प्याची चाचणी यशस्वी

## नगरच्या रेल्वे प्रवासाला मिळणार सुपरफास्ट गती

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



दौंड डबल लाईन रेल्वे मार्ग प्रकल्पांतर्गत अकोळनेर ते निंबळक या १८.२१ किलोमीटर अंतरावरील पाचव्या टप्प्याची हायस्पीड चाचणी सोमवारी (दि. १८) यशस्वीरीत्या पार पडली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे नगरच्या रेल्वे प्रवासाला मोठी गती मिळणार असून भविष्यात रेल्वे सेवा अधिक वेगवान, सुरक्षित आणि वेळेवर धावणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

नगर-दौंड द्रुतगती डबल लाईन रेल्वे मार्गाचे काम गेल्या तीन वर्षांपासून युद्धपातळीवर सुरू आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून संपूर्ण मार्गाचे आधुनिकीकरण करण्यात येत असून सर्वत्र इलेक्ट्रिक इंजिनद्वारे रेल्वे वाहतूक सुरू करण्यावर भर दिला जात आहे. यापूर्वी नगर-मनमाड मार्गावरील विविध टप्प्यांच्या चाचण्या पूर्ण करण्यात आल्या असून १८४ किलोमीटर डबल लाईन मार्गाची यशस्वी तपासणी झाली आहे. मनमाड-दौंड रेल्वे मार्गामध्ये अहिल्यानगर रेल्वे स्थानक हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. मात्र, अनेक वर्षांपासून हा मार्ग सिंगल लाईन असल्याने रेल्वेगाड्यांचा वेग मर्यादित राहत होता. अनेकदा क्रॉसिंगसाठी रेल्वेगाड्यांना तासन्तास थांबावे लागत असल्याने प्रवाशांचा वेळ वाया जात होता. आता डबल लाईनचे काम पूर्णत्वाकडे जात असल्यामुळे विनाकारण होणारे थांबे बंद होणार असून रेल्वे वाहतुकीचा वेग मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

या मार्गावर रेल्वेगाड्या ताशी १३० किलोमीटर वेगाने धावू शकतील, अशी क्षमता विकसित करण्यात येत आहे. सोमवारी झालेल्या चाचणीत द्रुतगती मार्गावरील रेल्वेचा नेमका वेग, ट्रॅकची क्षमता आणि सुरक्षिततेची तपासणी करण्यात आली. नगर ते दौंड या टप्प्यातील काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून लवकरच हा मार्ग पूर्ण क्षमतेने सुरू होण्याची शक्यता आहे. उपमुख्य अभियंता (बांधकाम) सागर चौधरी यांनी सांगितले की, "अकोळनेर ते निंबळक डबल लाईन द्रुतगती रेल्वे मार्गाच्या पाचव्या टप्प्याची चाचणी यशस्वी झाली आहे. या प्रकल्पामुळे नगरच्या रेल्वे प्रवासात ऐतिहासिक बदल होणार असून प्रवाशांना सुपरफास्ट सेवांचा लाभ मिळेल." या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाली चाचणी - अकोळनेर ते निंबळक द्रुतगती रेल्वेमार्गाच्या चाचणीवेळी रेल्वे सुरक्षा आयुक्त गुरू प्रकाश, मुख्य प्रशासकीय अधिकारी भुवनेश कुमार गुप्ता, मुख्य अभियंता बी. के. सिंह, उपमुख्य अभियंता सागर चौधरी (बांधकाम), सहाय्यक कार्यकारी अभियंता राजनारायण सैनी, अजय सिंह, धर्मेंद्र कुमार, सिनियर सेक्शन इंजिनिअर आर. डी. सिंह, अजय राणा, एस. के. सिंह, सुद्धांसू कुमार, प्रगती पटेल, परशुराम राठोड, धम्मरत्न संसारे,रामजी कुमार, प्रशांत कुमार आदी उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे

## शुभदावाव्हळ यांना उत्कृष्ट ग्रामविकास सन्मान पुरस्काराने सन्मानित



खोडद (स. गांवकरी) : उत्तर पूणे जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत कार्यक्षमपणे चालवणाऱ्या ग्रामपंचायत नारायणगाव नगरीच्या लोकनियुक्त महिला सरपंच डॉक्टर सौ. शुभदाताई पंकज वाव्हळ यांची आदर्श सरपंच म्हणून निवड करण्यात आली असून त्यांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. त्यांना 'उत्कृष्ट ग्रामविकास सन्मान पुरस्कार २०२६' जाहीर झाल्याबद्दल तमाम नारायणगावकरांच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

## कामठा (बु.) येथील शेतकऱ्यांचा खून

अर्धापूर (स. गांवकरी) : तालुक्यातील कामठा बु. येथील शेतकरी घराच्या समोर झोपला असतांना डोक्यात गंभीर मार लागल्यामुळे मृत्यू झाला आहे. हि घटना दि.१८ मंगळवारी रोजी मध्यरात्री २-३० ते ५ च्या दरम्यान घडली असल्याचा संशय आहे. कामठा येथील शेतकरी प्रल्हाद राजाराम कल्याणकर (वय ५६ वर्ष) यांच्या कानाच्या वर डोक्याला जबर वार करून गंभीर जखमी झालेल्या शेतकरी जागीच ठार झाला आहे. या घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधिक्षका अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजन यांनी भेट देऊन पोलीस निरीक्षक चंद्रकांत कदम यांना तपास करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जमादार ताटे, पप्पू चव्हाण, रणवीरकर,आर.एस. नरवाडे,संभाजी शिवभक्त, सुभाष मुंगळ, बाबाराव चाटे, संतोष काळे,इंदुताई गवळी या खुन प्रकरणी सखोल चौकशी करीत आहेत. या खुन प्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## नारायणगाव येथे मोफत आर्ट अँड क्राफ्ट ड्रॉइंग समर कॅम्पचे आयोजन



खोडद (स. गांवकरी) : राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान व ग्रामपंचायत नारायणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 5 ते 15 वर्ष वयोगटातील लहान मुलांसाठी खास मोफत आर्ट अँड क्राफ्ट ड्रॉइंग समर कॅम्प बुधवार दि. 20 मे 2026 ते रविवार दि. 31 मे 2026 या कालावधीत दुपारी 1 ते 2 वाजेपर्यंत श्री विरोबा हॉल पाटे आळी, नारायणगाव येथे आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती नारायणगावचे माजी प्रथम लोकनियुक्त सरपंच तथा विद्यमान उपसरपंच योगेश उर्फ बाबू पाटे यांनी दिली. या शिबिरात प्रशिक्षक संतोष भिमराव खुडे सर हे मुलांना चित्रकला हस्तकला व पेपर क्राफ्ट चे विशेष प्रशिक्षण देणार आहेत.ज्या मुलांना या शिबिरात सहभागी व्हायचे आहे त्यांनी सौ. भावना महेश बेल्हेकर (मो. नं.8766825327),सौ. सुचिता संकेत क्षीरसागर ( मो. नं.7038278382), सौ. सुप्रिया नंदू अडसरे(मो. नं.8390603103), सौ. शारदा रामदास बाळसराफ(मो. नं.9860708250), सौ. प्रिया अनिल खैरे(मो. नं.9665480811) यांच्याशी संपर्क करावा. व परिसरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या मोफत शिबिरात सहभागी होऊन आपल्या कलागुणांना वाव द्यावा,असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## उष्माघातामुळे शेतकऱ्याचा मृत्यू; कुटुंबाला आर्थिक मदतीची मागणी!



अकोले (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील कळस बुद्रुक येथील शेतकरी दिगंबर जनार्दन वाकचौरे यांचे २६ एप्रिल २०२६ रोजी उष्माघातामुळे हृदयविकाराचा झटका आल्याने निधन झाले. या घटनेमुळे वाकचौरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून त्यांच्या कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. दिगंबर वाकचौरे हे अल्पभूधारक आणि अत्यंत गरीब कष्टकरी शेतकरी होते. त्यांच्या पश्चात पत्नी व एक लहान मुलगा असा परिवार असून घरातील एकमेव कमावती व्यक्ती हरपल्याने कुटुंब गंभीर आर्थिक संकटात सापडले आहे. रोजंदारी मजुरी करून संसार चालवणाऱ्या या कुटुंबाची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. राज्यात वाढत्या तापमानामुळे उष्माघाताच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने अनेक कुटुंबांवर अशा प्रकारचे संकट ओढवत आहे. त्यामुळे मानवी संवेदनशीलतेच्या दृष्टिकोनातून शासनाने या प्रकरणाकडे विशेष बाब म्हणून पाहून वाकचौरे कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, शासनाने या पत्राची दखल घेऊन मदत जाहीर करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

## अल्पवयीन मुलगी ३६ तासांच्या थरारक तपासानंतर सुटका

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अपहरण झालेल्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले आहे. 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत कोतवाली पोलिसांनी सलग ३६ तास थरारक तपास करत मुलीची सुटका केली आणि संशयित आरोपीला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले होते. याप्रकरणी संशयित आरोपी प्रदीप उर्फ व्हन्या परशुराम इजगत (रा. रेल्वे स्टेशन बोहरी चाळ, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध पीडितेच्या पालकांनी कोतवाली पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी आणि मुलगी बेपत्ता होते. पोलीस त्यांचा कसून शोध घेत होते. दरम्यान, आरोपी हा मुलीसह पुणे शहरातील वानवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत लपून बसल्याची गोपनीय माहिती कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना मिळाली. त्यांनी तातडीने तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील, महिला पोलीस कॉन्स्टेबल श्वेता परमासागर, पोलीस कॉन्स्टेबल याकूब सय्यद आणि अमोल गाडे यांचे विशेष पथक तयार करून पुण्यात रवाना केले.

## भव्य ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयागास प्रारंभ

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



जगावर जे संकट आले आहे ते दूर होण्यासाठी आधिक मासानिमित्त अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघ संचलित महर्षी वेद विद्यालय च्या वतीने भव्य ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयाग काल पासून चितळेरोडवरील ऋग्वेद भवनात सुरू झाला आहे. या धार्मिक विधीत वेदघोष, मंत्रोच्चार, हवन व विविध वैदिक कार्यक्रम संपन्न होत आहेत. अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाचे उपाध्यक्ष राजकुमार जोशी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली यागास सुरूवात झाली.

सकाळी यजमान प्रसाद कडेकर व अशोक कुलकर्णी सपत्नीक यांच्या हस्ते अग्नी प्रदीप्त करून भव्य ऋग्वेद स्वाहाकार व विष्णुयागास प्रारंभ झाला. प्रायश्चित्त, श्री गणेश व पुण्याह वाचन, मातृकापूजन,नांदी श्राद्ध, योगिनी मंडल पूजन,वर्धिनी कलश पूजन, भैरव मंडल,रूद्र मंडल,नवग्रह आदी पूजन करण्यात आले.

राजकुमार जोशी यांनी सांगितले देशावर जे संकट आले आहे ते दूर व्हावे याकरीता आधिकमासात या याग करत आहेत जेणेकरून ते संकट दूर होउन सुखशांती आरोग्य लाभेल अहिल्यानगर जिल्हा ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष किशोर जोशी ,मयूर जोशी, अमोल कापरे, प्रसाद कुलकर्णी,सागर गोवर्धन, अवधूत भणगे, श्रीकांत जोशी,ओम जोशी, गणेश भालेराव यांच्या उपस्थितीत कार्यक्रमास प्रारंभ झाला. २२ मे रोजी दुपारी साडेबारा वाजता पूर्णाहूती करून महाप्रसादाने सांगता होईल. या यागामध्ये सहभागी होण्यासाठी व यजमान म्हणून बसण्यासाठी भाविकांनी ९७६३०३२०३१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पुण्यलाभ घ्यावा, असेही आयोजकांतर्फे सांगण्यात आले.

## विहिंपचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचा रक्तदानाचा गौरव पुरस्काराने विशेष सन्मान

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी च्या आंदोलनात शहीद झालेले रामकुमार कोठारी व शरद कुमार कोठारी बंधूंच्या स्मरणार्थ व विश्व हिंदू परिषदेचे माजी जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे यांच्या जन्मदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनकल्याण समिती संचलित 'जनकल्याण रक्तकेंद्र, अहिल्यानगर' यांच्या वतीने आयोजित सोहळ्यात विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित आयाम या संस्थेला रक्तदान शिबिराचे उत्कृष्ट आयोजन करून 'रक्तदान चळवळीत' मोलाचे सहकार्य केल्याबद्दल हा बहुमान मिळाला आहे.

रक्तदान शिबीर संयोजक गौरव पुरस्कार (सन्मानचिन्ह) देऊन गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह जनकल्याण समितीचे माजी अध्यक्ष डॉ.रवींद्र साताळकर यांच्या हस्ते देण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक

नानासाहेब जाधव,मराठा चैंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष अरविंद पारगावकर,जनकल्याण रक्तकेंद्राचे अध्यक्ष अभय मेस्त्री,कार्यवाह सतीश इंदानी, संचालक आदित्य चांदेकर, पुरस्कार स्वीकारताना विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर,मंदिर आर्चक पुरोहित आयामाचे जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,जिल्हा सह मंत्री राजेंद्र चुंबळकर,गायत्री परिवाराचे काशीनाथ मोडे,सुरेंद्र सोनवणे आदी उपस्थित होते. यावेळी विहिंपचे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अमोल भांबरकर म्हणाले,रक्तदान हे महान कार्य आहे. रक्तदानाच्या महान कार्याबद्दल गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आले.ही अत्यंत आनंदाची बाब आहे.विश्व हिंदू परिषदेचे सामाजिक कार्यात पुरस्काराने आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. हा पुरस्कार संस्थेच्या सर्व पाठीराख्यांना, कार्यकर्त्यांना आणि रक्तदात्यांना समर्पित केला आहे. तुमच्या साथीशिवाय हे शक्य नव्हते. हेच प्रेम आणि सहकार्य पुढेही कायम राहो, हीच अपेक्षा आहे.

## निवडणूक कामकाजात हलगर्जीपणा; पोलिसांत गुन्हा

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

मतदार यादी अद्ययावतीकरण व मतदार मॅपिंगच्या महत्त्वाच्या निवडणूक कामकाजात हलगर्जीपणा केल्याचा आरोप करत नगर महानगरपालिकेतील एका कर्मचाऱ्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेंद्र फुलारी (रा. नय्यर शाळेसमोर, पाईपलाईन रस्ता, सावेडी) असे गुन्हा दाखल झालेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. यासंदर्भात सुनील नेटके (वय ४३, रा. शेंडी) यांनी फिर्याद दिली आहे. ते पेमराज सारडा कॉलेजमध्ये ग्रंथालय लिपीक म्हणून कार्यरत असून सध्या २२५ नगर शहर विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यक्रमांत १० बीएलओ कार्यरत असून निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादी अद्ययावत करणे व मतदार मॅपिंगचे काम सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर सावेडी परिसरातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी क्रमांक २३ म्हणून कार्यरत असलेले मनपा कर्मचारी राजेंद्र फुलारी यांच्यावर निवडणूक विषयक कामात विलंब, टाळाटाळ, दिरंगाई व हलगर्जीपणा केल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित कर्मचाऱ्याची सन २०२३ पासून बीएलओ म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार त्यांच्यावर मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्निरिक्षणाचे काम सोपविण्यात आले होते. फिर्यादीनुसार, फुलारी यांनी १६ एप्रिल २०२६ पासून निवडणूक कामकाज करण्यास टाळाटाळ केली. त्यांना वेळोवेळी बैठका घेऊन तसेच लेखी व तोंडी सूचना देण्यात आल्या होत्या.

## बजाज जनरल इन्श्युरन्सचा 'एमएचसीपी एज+' हेल्थ प्लॅन लाँच

पुणे : (स. गांवकरी)




Bajaj General Insurance या भारतातील आघाडीच्या प्रायव्हेट जनरल इन्श्युरन्स कंपनीने 'माय हेल्थ केअर प्लॅन एज+' (एमएचसीपी एज+) हा नवा हेल्थ इंडेम्निटी प्लॅन लाँच केला आहे. वाढत्या आरोग्यसेवा खर्चाच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांना अधिक लवचिक, सानुकूलित आणि व्यापक संरक्षण देण्याच्या उद्देशाने हा प्रगत प्लॅन सादर करण्यात आला आहे. एमएचसीपी एज+ अंतर्गत ₹5 लाखांपासून ते ₹5 कोटींपर्यंत सम इन्श्युअर्डचे पर्याय उपलब्ध असून, एका पॉलिसी वर्षात अनलिमिटेड रिइन्स्टेटमेंटची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे अनेक वेळा क्लेम झाल्यासही ग्राहकांचे संरक्षण कायम राहणार आहे. या प्लॅनमध्ये रूम भाडे, आयसीयू शुल्क, शस्त्रक्रिया, आधुनिक उपचार पद्धती, आयुष उपचार, हॉस्पिटलायझेशनपूर्व व नंतरचा खर्च, डे केअर प्रक्रिया, घरगुती हॉस्पिटलायझेशन, अवयव दात्याचा खर्च तसेच आपत्कालीन ॲम्ब्युलन्स सेवांचा समावेश करण्यात आला आहे. एमएचसीपी एज+ चे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याची मॉड्युलर रचना. ग्राहकांना विविध ॲड-ऑन्स आणि रायडर्सच्या माध्यमातून आपले कव्हरेज गरजेनुसार सानुकूलित करता येणार आहे.

# डॉ. नीलमताई यांचे कार्य कौतुकास्पद

**युवराज दाखले**

खोडद : (स. गांवकरी)



> "डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी महिला सक्षमीकरण, बचत गट चळवळ, हुंडाबळी विरोधी कायदा व व्यापारी महिलांच्या हक्कांसाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे.
> -युवराज दाखले,संस्थापक अध्यक्ष, शिवशाही व्यापारी संघ महाराष्ट्र राज्य

पुणे येथे शिवशाही व्यापारी संघाच्या वतीने सन्मान सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात केला होता.त्यावेळी शिवसेना नेत्या व विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे यांची विधानपरिषदेवर सलग पाचव्यांदा बिनविरोध निवड झाल्याबद्दल शिवशाही व्यापारी संघाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष युवराज दाखले व भीमशक्ती-शिवशक्ती - लहुशक्ती समन्वय प्रमुख गुलाबराव गरूड यांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी युवराज दाखले म्हणाले, "डॉ. नीलमताई गोऱ्हे ह्या महाराष्ट्राच्या राजकारणातील एक झुंजार व लढाऊ महिला नेतृत्व आहे. सलग पाच वेळा बिनविरोध निवडून येणे हा त्यांच्या कार्याचा व जनतेशी असलेल्या नात्याचा मोठा पुरावा आहे. महिलांचे प्रश्न, कामगारांचे हक्क व व्यापारी वर्गाच्या अडचणी सोडवण्यासाठी त्या विधानपरिषदेत नेहमीच आक्रमक भूमिका घेतात."

"नीलमताई या फक्त शिवसेनेच्याच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील महिलांसाठी प्रेरणास्थान आहेत.

विरोधकांनाही त्यांच्या विरोधात उमेदवार देता येत नाही, हीच त्यांची खरी ताकद आहे. नीलम ताई गो-हे नारीशक्ती म्हणून त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे. शिवशाही व्यापारी संघाच्या वतीने आम्ही त्यांचे मनापासून अभिनंदन करतो व पुढील वाटचालीस शुभेच्छा देतो," असे युवराज दाखले यांनी सांगितले.



मार्गदर्शक



अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक
अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष,
बुवासाहेब नवले ग्रा.बि.शेती सहकारी
पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष
राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते

# मा.श्री.मधुकरराव नवले (भाऊ)

यांना वाढदिवसानिमित्त



## हार्दिक शुभेच्छा

-: शुभेच्छूक :-

विद्यार्थ्यांचे शिक्षणातून स्वावलंबन हेच ध्येय...

## अभिनव शिक्षण संस्था, अकोले

धामणगाव आवारी रोड, ता.अकोले, जि.अहमदनगर
फोन : (०२४२४) २२१२८३, २२३४५८, फॅक्स: (०२४२४) २२३९४३

संस्थेचा विस्तार :-

मा.श्री.मधुकरराव नवले (संस्थापक अध्यक्ष)



- मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स
- मातोश्री पार्वतीबाई कोते शिक्षणशास्त्र महाविद्यालय
- अध्यापक विद्यालय
- व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय
- वसुंधरा अकॅडमी
- मुळा व्हॅली इंग्लिश मिडीयम स्कुल, कोतूळ
- सह्याद्री व्हॅली इंग्लिश मिडीयम स्कुल, राजूर
- अभिनव कॉलेज ऑफ सायन्स
- अभिनव वसतिगृह, अकोले
- इंटरनॅशनल सर्टिफिकेट कोर्स इन टुरिझम मॅनेजमेंट
- पत्रकारीता पदवी अभ्यासक्रम

## बुवासाहेब नवले मल्टीस्टेट को. ऑप.क्रेडीट सोसायटी, लि.

अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर



मा.श्री.विक्रमराव नवले
चेअरमन
संचालक,अ.स.सा.का.



मा.श्री.नवनाथ वाळुंज
व्हा.चेअरमन

सन्मा.संचालक मंडळ

मा. कपिल प्रमोद रासने
सौ. रचना वसंत बाळसराफ
श्री. श्रीकांत आनंद नवले
श्री. मदन गंगाधर आंबरे
श्री. एकनाथ भिकाजी सहाणे
मा. रोहिदास जाधव
श्री. महीपाल प्रल्हाद देशमुख
श्री. रघुनाथ किसन शेणकर
सौ. सुनेत्रा सतीश वाकचौरे
श्री. रमेश काशिनाथ नाईकवाडी
श्री. सचिन रमेश जगताप
श्री. सुनिल मनोहर नवले

श्री. विलास दादा नवले (कार्यकारी संचालक)

## बुवासाहेब नवले

ग्रा.बि.शे.सहकारी पतसंस्था मर्या; अकोले
ता.अकोले, जि.अहमदनगर

मा.श्री.मधुकरराव नवले (चेअरमन)
मा.श्री.रमेशराव जगताप (व्हा.चेअरमन)

सन्मा.संचालक मंडळ

मा. आनंद निवृत्ती नवले
मा. प्रकाश आण्णासाहेब देशमुख
मा. विठ्ठल ममताजी धुमाळ
मा. रामदास विठ्ठल धुमाळ
मा. भास्कर कोंडाजी दराडे
मा. दिलीप उमाजी मंडलिक
मा. शिवाजी आनंदा चौधरी
मा. मुरलीधर सिताराम शेणकर
मा. सुजीत गुलाब नवले
मा. भाऊसाहेब बाळाजी झोळेकर (त.सं.)
मा. शांताराम तुकाराम काकड
मा. लखन माता शिंदे (सरव्यवस्थापक)
मा. गवराम महादु ताजणे
मा. रामदास लक्ष्मण शेटे
मा. साईनाथ भाऊसाहेब नवले
मा. अनिल जनार्दन गायकवाड
मा. भागवत रावसाहेब शेटे
मा. विक्रम एकनाथ मंडलिक
मा. सुर्यभान सुदाम नाईकवाडी
सौ. प्रतिभा भास्कर घुले
सौ. संगिता कोंडीराम चौधरी
मा. शरद सखाराम पानसरे (स्वी.सं.)
मा. दादाभाऊ झोळेकर (व्यवस्थापक कर्ज विभाग)

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)


आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित,
आनंदगड शैक्षणिक संकुल
आनंदगड, वीरगाव ता. अकोले, जि. अहिल्यानगर
२५
गौरवमहोत्सवी वर्ष
वर्ष १९९९-२०२४
पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आनंदगड शैक्षणिक संकुल येथे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जातात!
(D.T.E., MSBTE, DBAT University P.C.I. Approved)
DTE Code
5480
मातोश्री राधा
कॉलेज ऑफ फार्मसी
डी फार्मसी
पात्रता १२ वी पास (PCB / PCM)
कालावधी २ वर्ष
प्र.क्षमता ६० विद्यार्थी
बी फार्मसी
पात्रता १२ वी पास (PCB / PCM & CET)
कालावधी ४ वर्ष
प्र.क्षमता ६० विद्यार्थी
विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध!
- संपर्क -
7709203202
9421190696 I 9689758321
ग्रामीण महाराष्ट्रातील ISO मानांकित शाळा
धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश
मिडिअम स्कुल अँण्ड ज्युनिअर कॉलेज
के जी ते १२ वी विज्ञान शाखा
(इंग्रजी माध्यम)
अत्यल्प फी
सर्वोत्कृष्ठ शिक्षण
आपल्या पाल्याच्या
शालेय प्रवेशासाठी
संस्कारक्षम
इंग्रजी माध्यमाची
प्रयोगशील शाळा
- संपर्क -
9158077688
7875074070 I 9975276670
आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज
पत्ता: आनंदगड शैक्षणिक संकुल, आनंदगड, वीरगांव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
DTE, Govt of Maharashtra M.S.B.T.E., Mumbai AICTE, New Delhi Approved
सिव्हिल इंजिनिअरिंग 60
मॅकेनिकल इंजिनिअरिंग 60
कॉम्प्युटर इंजिनिअरिंग 60
इलेक्ट्रिकल अँण्ड इलेक्ट्रॉनिक्स 60
आर्टिफिशीअल इंटेलिजीअंस अँण्ड मशीन लर्निंग 60
DTE Code
05662
- संपर्क -
9209645837 I 9922545516
9765431168 I 7028724045 I 9922161686
महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व
औषधी द्रव्य विभाग महाराष्ट्र कॉन्सिल ऑफ अँक्युपंक्चर,मुंबई
- मान्यता प्राप्त वैद्यकीय अभ्यासक्रम -
Anandgad Virgaon
मातोश्री गंगुबाई शिंदे
ॲक्यूपंक्चर कॉलेज अँण्ड हॉस्पिटल
डिप्लोमा इन ॲक्युपंक्चर थेरपी (DAT)
प्रवेश क्षमता ५० विद्यार्थी
डिप्लोमा कालावधी २ वर्षे
शैक्षणिक पात्रता इ. १२ वी पास
सुविधा
सर्व सुविधायुक्त भव्य कॉलेज व हॉस्पिटल इमारत
तज्ञ व अनुभवी प्राध्यापक व अँक्युपंक्चरिस्ट
अँक्युपंक्चर उपचार पद्धती सुविधा
वसतिगृह सुविधा उपलब्ध
- संपर्क -
9011271729
9834719663 I 7028724045
॥ सुजाता ॥ अकोले 9970095289